महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९३७ /२०२३ दि. ०६/०९/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** विठ्ठलवाडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि. ०७/०९/२०२३ रोजी नेताजी चौक, उल्हासनगर ०५ या ठिकाणी **'दहिहंडी'** सण साजरा करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमात मोठया संख्येने गोविंदा पथक सहभागी होणार आहेत. सदर कार्यक्रमाचे वेळी नागरिक मोठया प्रमाणात उपस्थित राहणार आहे. नमूद परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) व्हिनस चौक कडून नेताजी चौक कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **भारत इलेक्ट्रिकल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने भारत इलेक्ट्रिकल येथून डावे वळण घेवून शिवनेरी हॉस्पिटल कडून भाटीया चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) हिललाईन पो. स्टे. व मठ मंदिर, उल्हासनगर ०५ कडून नेताजी चौक कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **जुना नेताजी चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने मेहर मोटर्स येथून डावे वळण घेवून माणेरेगाव रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) भाटीया चौक कडून नेताजी चौक कडे येणाऱ्या वाहनांना **उल्हासनगर महानगर प्रभाग समिती ०४ कार्यालयासमोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने भाटीया चौक कडून उजवे वळण घेवून उल्हास स्टेशन मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) साई वसनशहा बंगला नगर कडून नेताजी चौक कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **जय माताजी ज्युस सेंटर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने साई वसंतशाह कमानी येथून डावे वळण घेवून व्हिनस चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसूचना दि. ०७/०९/२०२३ रोजी सकाळी ०९:०० ते दहिहंडी उत्सव संपेपर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.

CamScanner

मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद.

<u>**प्रत कार्यवाहीसाठी**</u> **:–**
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–४ उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

<u>**प्रत**</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

<u>**प्रत**</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>**प्रत**</u> :– सपोआ वाहतूक विभाग, उल्हासनगर व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.उल्हासनगर च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक ठिकाणी सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner